गद्यपाठ 7

ठळक मुद्दे

- पाठाचे नाव : एक वेडा देशभक्त
- लेखक : चिं.त्र्यं.खानोलकर
- साहित्यप्रकार :चरित्र/आत्मचरित्र  या साहित्य प्रकारातील 'आठवणी' हा उपप्रकार.

- आठवणी :एक वेडा देशभक्त- भारतीय इतिहासातील एका दिवसाची आठवण. त्या दिवसाच्या मनावर कोरल्या गेलेल्या लेखकाच्या आठवणींचे चित्रण. त्या दिवसाशी निगडित असणा-या एका व्यक्तीच्या  आठवणी, सामान्य वाटणा-या व्यक्तीचे कृती-उक्ती मधून असामान्यत्व चित्रित होणे.

## प्रस्तावना

१.चिं. त्र्यं. खानोलकर यांचे नाव साहित्यात अजरामर झाले ते त्यांच्या प्रतिभेमुळे. आणि त्यांच्या लेखनातील वेगळेपणामुळे.

चिं. त्र्यं. खानोलकर यांच्याविषयी येथे वाचा-

http://maharashtratimes.indiatimes.com/articleshow/2983265.cms

भारतीय साहित्यातील सर्वोच्च बहुमान साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळविणारे चिं.त्र्यं. खानोलकर यांचा हा पाठ अभ्यासताना कसा विचार करायचा ते एकदा 'आठवणी' या टिपणाच्या साह्याने पुन्हा समजून घ्या.

टिपणातील मुद्द्यांच्या साह्याने पाठाचे वाचन करा.

| विचार करा: ह्या आठवणींचे तुमच्या दृष्टीने काय महत्व आहे? |
|---|

भारतीय इतिहासातील सोनेरी अक्षरांनी लिहावा अशा दिवसाची आठवण.लेखक वयाने लहान होते. तरीही त्या दिवसाच्या मनावर कोरल्या गेलेल्या आठवणींनी  भारावून गेलेले चित्रण त्यांनी केले आहे. त्या दिवसाशी निगडित असणा-या एका व्यक्तीच्या  आठवणीतून त्यांनी , वरवर सामान्य वाटणा-या असामान्यत्व चित्रित केले आहे. लेखकाला प्रसंगानुरूप त्या व्यक्तीचे असामान्यत्व लक्षात राहिले. लेखकाने त्या व्यक्तीच्या कृती-उक्ती मधून असामान्यत्व चित्रित केले आहे.

**विलक्षण अनुभव**

वाचनाच्या व अभ्यासाच्या दृष्टिकोनातून या पाठाचे दोन भाग करू या.पहिली आठवण एका दिवसातील रसरसत्या विलक्षण अनुभवाची. तर दुसरी आठवण त्याच अनुभवाच्या निमित्ताने एका सामान्य व्यक्तितील असामान्यत्वाची.

९ ऑगस्ट १९४२ या दिवशी महात्मा गांधी यांनी इंग्रजांविरुद्ध 'चले जाव"ची घोषणा केली.. भारत छोडो चळवळ भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामातील सर्वांत प्रभावी चळवळ ठरली. यात लाखांच्या संख्येने लोकांना अटका झाल्या, अभूतपूर्व अत्याचार करण्यात आला.[१४] हजारो आंदोलक पोलिसांच्या गोळीबारात मरण पावले.गांधीजी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी हे स्पष्ट केले की भारताला तात्काळ स्वातंत्र्य दिल्याशिवाय भारत महायुद्धात मदत करणार नाही. गांधीजींनी हेसुद्धा स्पष्ट केले की यावेळेस एखाद-दुसऱ्या हिंसक घटनेमुळे ही चळवळ मागे घेण्यात येणार नाही. *आवरात ठेवलेल्या अराजकतेपेक्षा खरी अराजकता बरी.* असे सुचवून त्यांनी काँग्रेस सदस्यांना अहिंसेचे पालन करण्याचे आवाहन केले आणि भारतीयांना 'करो या मरो' (करा किंवा मरा) हा मूलमंत्र दिला.

**लेखकाच्या मनावरील परिणाम**

या दिवशी प्रत्येक जण वेगळ्या शक्तीने भारावलेला होता.ही शक्ती होती स्वातंत्र्याच्या जाणीवेची, देशप्रेमाची. आपल्या देशाला पारतंत्रातून मुक्त करणे या भावनेने जनता पेटलेली होती. देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणांचे मोल देण्याची प्रेरणा जागृत झाली होती.या घटनेचे आकलन होण्यासारखे लेखकांचे त्यावेळी वयही नव्हते. तरीही त्यांचे मन स्वातन्त्र्याचा अर्थ् समजू शकले. लेखकाने चित्रित केलेल्या गर्जनेचा अर्थ ती प्रेरणा किती तीव्र होती ते दर्शवितो.. त्या सा-या घटनेचे मनावर झालेले संस्कार लेखकांनी चित्रित केले आहेत.इंग्रजांना 'चले जाव' सांगणा-या या मंत्राने सारेच भारावून गेले होते, पेटून उठले होते.

| |
|---|
| विचार करा: सदमामाची आठवण आपल्याही आठवणीत का राहते? |

**असामान्य व्यक्तीमत्त्व**

तुम्ही लहानांच्या मोठ्या गोष्टी ऐकल्या असतील. तशीच ही एक आठवण आहे या दिवशी घडलेल्या एका प्रसंगाची. गावातील वृद्ध सदाने असाच एक स्वातन्त्र्यासाठी संदेश आपल्या पारव्याच्या साहाय्याने आणि सर्व मुलांच्या मदतीने इंग्रजांसाठी पाठविला.खरतर काही मुलांना तो वेडेपणा वाटला. त्या मुलांनी त्यांची टिंगलही केली. पण स्वातंत्राच्या प्रेरणेने भारावलेल्या त्याच्या मनाला जे शक्य होते ते केले. त्या कामातील त्याचा तो खारीचा वाटा होता.

वरवर दिसणारी ही साधी कृती इंग्रजांच्या दृष्टीने किती घातक होती ते पोलिसांच्या कृतीवरून दिसून येते.म्हणूनच लेखकाने त्याला ‘एक वेडा देशभक्त’ म्हटले आहे. हे वेडेपण म्हणजे देशभक्तीने प्रेरित झाल्यामुळे प्राणांचीही पर्वा ना करणारे व्यक्तिमत्त्व होय.

अशा अनेक सामान्यांच्या असामान्य गोष्टी आपल्याला वाचायला मिळतात आणि जगण्याचा खरा अर्थ लक्षात येतो. जो स्वत:साठी ‘जगतो’ तो ‘मरतो’ पण जो दुस-यासाठी ‘मरतो’ तोच खरा ‘जगतो’. अशाच लोकांच्या त्यागी वृत्तींमुळे आपण स्वातंत्र्याचे सुख अनुभवतो. तेव्हा अशा व्यक्तींना त्रिवार वंदन!

| |
|---|
| लेखकाच्या भाषाशैलीची कोणती वैशिष्ट्ये तुम्ही नोंदवाल? |

**भाषाशैली**

खानोलकरांची वैशिष्ट्ये- ही वैशिष्ट्ये शोधण्यासाठी खाली काही विधाने दिली आहेत. त्या पुढे तुम्हाला जाणवलेले वैशिष्ट्य नोंदवा.

१.शांतिब्रह्मसुद्धा अशा एखाद्या दिवशी सर्वशक्तीचे तेज घेऊन गर्जना करते, ‘चले जाव’ आणि मग स्वातंत्र्यसमराचे शिपाई सहजच आपली हृदये फुलासारखी खुडून त्या महायज्ञात फेकून देतात.-

२. देश कसल्यातरी आचेने रसरसून उठल्याची जाणीव होत होती.-

३. “हा लिहा. गो-या सायाबांनो, तुम्ही हा देश सोडून चालते व्हा, नाहीतर हा सदामामा तुमचा जीव घेतल्याशिवाय राहणार नाही.”-

४.”माझी पाखरं निरोप पोचवणार” आणि मग संध्याकाळी पोलिसांनी त्याला पकडून नेले.-

अशाच काही वाक्यांतून लेखकाच्या भाषाशैलीची वैशिष्ट्य नोंदवा.

**या पाठाव्यातिरिक्त तुमच्या पाठ्यपुस्तकातील अजून दोन पाठ आठवणी या लेखनप्रकारात मोडतात. त्याविषयी येथे क्लिक करा.**

स्वाध्याय –

**उजळणी प्रश्न**

अ..खालील वाक्यांचे संदर्भासह स्पष्टीकरण करा.

१.देश कसल्यातरी आचेने रसरसून उठल्याची जाणीव होत होती.

२.एखादा दिवस शतकाशतकांना उजळून टाकणारा महामंत्र घेऊन येतो.

ब..खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ३० ते ४० शब्दांत लिहा.

१.माणूस म्हणून केलेल्या गर्जनेचा अर्थ तुमच्या शब्दांत लिहा.

२.सदामामाला "एक वेडा देशभक्त' असे का म्हटले आहे?

क. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ५० ते ६० शब्दांत लिहा.

१. ९ ऑगस्ट १९४२ या दिवसाचे वर्णन तुमच्या शब्दांत लिहा.

२. सदामामाचे शब्दचित्र रेखाटा.

**मुक्त प्रश्न**

१.खालील शब्द/शब्दसमुहांचा अर्थ तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

शांतिब्रह्म, सप्तसागराची शक्ती, आगीच्या एका ठिणगीत सूर्याची स्वयंप्रकाशी जाणीव, महात्माचा आत्मा,

२.ध्येयाने 'वेड्या' झालेल्या व्यक्तींपैकी एका व्यक्तीचे चरित्र १० ते१२ ओळींत लिहा.

३.१५ ऑगस्ट,स्वातंत्र्य दिनाला तुम्हाला भाषण शाळेत करायचे आहे. त्याची तयारी म्हणून भाषण तयार करा.